# Notification
## सूचना

म्हाडा सरळसेवा भरती-२०२१ अंतर्गत दि.०६.०६.२०२२, दि.०७.०६.२०२२, दि.०९.०६.२०२२, दि.१०.०६.२०२२, दि.१४.०६.२०२२, दि.१५.०६.२०२२, दि.१६.०६.२०२२ व दि. १७.०६.२०२२ रोजी कागदपत्र सादर करण्याकरीता उमेदवारांना बोलविण्यात आले होते, परंतु पुरेसे उमेदवार प्राप्त न झाल्याने कागदपत्र सादर करणेकरीता वरिष्ठ लिपीक संवर्गातील अंशकालीन व लघुटंकलेखक या संवर्गातील माजी सैनिक प्रवर्गातील उमेदवारांची सूची या सूचनेसोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रसिध्द केलेल्या सूचीमधील उमेदवारांनी दि.०५.१२.२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता क्र. ५२७, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे शैक्षणिक, सामाजिक तसेच समांतर आरक्षण विषयक व अनुभव विषयक सर्व कागदपत्रांचा एक संच व मूळ कागदपत्रासह हजर रहावयाचे आहे.

प्रसिध्द करण्यात आलेल्या वरिष्ठ लिपीक (अंशकालीन) सूचीमधील ज्या उमेदवारांनी दि.२२.११.२०२२ रोजी कनिष्ठ लिपीक- टंकलेखक संवर्गात कागदपत्र सादर करताना कागदपत्रांचा अतिरीक्त संच जमा केलेला आहे, त्यांनी पुन्हा कागदपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही कागदपत्र कमी असतील तर त्यांनी त्या कागदपत्रांच्या मूळ प्रतींची पी.डी.एफ़। फ़ॉर्मेट मधील प्रत adm.off.mhada@gmail.com या इमेल आय.डी. वर पाठवावी.

उमेदवारांनी सोबत आणावयाच्या कागदपत्रांची सूची म्हाडाच्या संकेतस्थळावर Recruitment 2021 - Candidates List for Document Verification - MHADA Recruitment 2021 List of Documents मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.

जे उमेदवार कागदपत्र सादर करणार नाहीत त्यांना पदभरती मध्ये स्वारस्य नाही असे समजण्यात येईल व त्यांचे नावाचा विचार करण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**